म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८५५.
१८२६



REFBK-0003140
REFBK-0003140

कविः- मध्वराज.

किंमत १ आणा.

॥ कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥

# वेणु-रव.

कवि 'मधुराज.'

—प्रकाशक—

सारस्वत सेवा मण्डळ


काव्य ८८९

६७४०

REFBK-0003140

REFBK-0003140


किंमत ? आणे

मुद्रकः— केशव सीताराम ठाकरे,
प्रबोधन मुद्रणालय, ३४५ सदाशिव पेठ, पुणें शहर.

प्रकाशकः— माधव व्यंकटेश मंगसुळीकर, सारस्वत सेवा मण्डळ, १४२० बसवणगल्ली, बेळगांव.

# आत्मनिवेदन.

जनता जनार्दन,

मऱ्हाठी सारस्वताच्या क्षेत्रांत पाऊल टाकण्याचा हा माझा पहिलाच बाल–प्रयत्न असल्यामुळें, आत्म-निवेदनांत संकोच आणि तज्जन्य भय यांची छटा उमटणें अनिवार्य आहे. आत्मनिवेदन इतकेंच कीं कांहीं गावेंसें वाटलें, श्रीकृष्णानें – त्या जगच्चालक ‘बोलवित्या धण्यानें’ बोलविलें, ते बोबडे बोल रसिकांच्या सेवेला सादर केले.

माझे पूज्य गुरुवर्य श्री मुकुंदराय उर्फ मुकुंद गणेश मिरजकर शास्त्री, पुणें यांच्या चरणीं हें माझें छोटेखानी प्रारिजातकाचें पुष्प मी प्रेमादरपूर्वक वाहूं नये, तर कोणाच्या? हें भक्तीचें कार्य. त्यासाठीं मामुली परवा-नगी रसवानगीची यातायात मला कशाला? गुरुराज, प्रणिपातपूर्वक या पुष्पाचा स्वीकार करावा.


माझे आश्रयदाते श्री. अनंत दत्तात्रय दातार बी.ए. एलेलबी, वकील, मिरज, आणि कविमित्र अनंतराव

कमतनूरकर बेळगांव यांच्या प्रोत्साहनानेंच हे 'ख' प्रकाशांत आले. त्यांच्या चरणीं माझे साष्टांग प्रणिपात असोत.

शेवटीं, जनता जनार्दनानें हे बोबडे बोल गोड मानून उत्तेजन द्यावें, हीच प्रार्थना.

मिरज, दातार वाडा.
ता.५ डिसेंबर १९२६

सर्वांचा कृपाकांक्षी
माधव व्यंकटेश मंगसूळीकर.



[ प्रबोधन प्रेस, पुणें. ]

२१.कार्य ८५९

गुरुवर्य मुकुंद राय यांना
सादर समर्पण.

आर्या! सेविसि यद्यपि श्रुतिपुटीं विद्वत्कृती साजिरी।
बाळाचें परि बोबडे परिसुनी संतोष हो अंतरीं॥
देवा तृप्ति घडे सदैव यदपी पीयुषपानें तरी।
भिल्लीची बदरें तयास रुचली हेही गमो त्यापरी॥
श्रीमन्मुकुंदरायाला। अर्पिली प्रथमाकृति॥
विनयें माधवें शिष्यें। करोनि चरणीं नति॥

चरणांकित माधव

# भगवंताची प्रार्थना.

भक्तवत्सला, जगत्पालका, करुणाकर श्रीकरा ॥
दयाळा ॥ दुरितनिवारा, अघसंहारा, वंदन
ओंकारा ॥ ध्रु० ॥

अघभयहरणा, विश्वलोचना, राधा-प्रिय माधवा ॥
दयाळा ॥ कठिण पातली वेळ भयंकर अवतारचि
घ्यावा ॥ १ ॥ हे कंसारी, कुंजाविहारी ! वाजव
तव बांसरी ॥ द० ॥ नादलुब्ध हा जीव होउं
दे ! भ्रमपटला सारी ॥ २ ॥ मायेचा बाजार
मांडिला, सत्य न उमजें कुणा ॥ द० ॥ चित्त
गुंतलें विषयसेवनीं विसरें तव ध्याना ॥ ३ ॥
अतर्क्य महिमा तुझा कळेना भ्रमतों भविं

भोंवरा ॥ द० ॥ मृगजल पाहुनि कुरंग जैसा चरणीं दे आसरा ॥ ४ ॥ विषयकर्दमीं लोळें निशिदिनिं खंति न वाटे मना ॥ द० ॥ भक्ति-पुष्प तव चरणीं वाहें माधव करुणाघना ॥५॥

---

## मुरली.

वाजवी कन्हया मुरली। चैतन्यें वृत्ती स्फुरली ॥
मुरलिचें ऐकुनी गान
देहावर नुरले भान
वाजवी नको अनुमान
राधिका भृंगि पदकमळीं ॥ वाजवी ०
सोडिले सकल विभवासी
आले मी तव चरणांशीं

परती न करावी दासीं
संसारी आशा नुरली ।। वाजवी०
ना सुचे मला घरधंदा
तुजविणें कांहिं गोविंदा
कधिं भेटसि परमानंदा
हृदयीं तव मूर्ती ठसली ।। वाजवी०
राधा मज प्यारी म्हणसी
कां त्रागा ऐसा करिसी
निष्ठुरता कैंवी धरसी
बावरी चकोरी झाली ।। वाजवी०
केली न जगाची खंती
गिरीधारी वरिलें अंतीं
चित्ताला पडली भ्रांती

सांवळी मूर्ति मनिं भरली ॥ वाजवी०
जगदीशा करुनी करुणा
ऐकवी ध्वनी या श्रवणा
तुजवीण आळवूं कवणा
वेणूस राधिका भुलली ॥ वाजवी०
मुरलींत वृत्ति ही मुरली
तुजसाठीं काया झुरली
आशा ही एकच उरली
पाहीन कधीं ती पुरली ॥ वाजवी०
गोविंदा विश्वाधारा
पाजवी सुधेची धारा
व्याकूळ जीव हा प्यारा
मुरलींत मोहिनी भरली ॥ वाजवी ०

देखुनी भाव राधेचा
द्रवला तो नाथ जिवाचा
समभाव होय उभयांचा
राधेला हृदयीं धरिली । वाजवी मुरारी मुरली
मध्वराज आला शरण
हृदिं नित्य पूजिं तव चरण
करुणेचें द्या आवरण
काव्यगानिं वृत्ती रमली ॥ वाजवी०

---



काव्य नं. ८५
७ ]

# वेणू-रव.

(कुंजवनांतील एका शिलाखंडावर श्रीकृष्ण राधिकेची मार्गप्रतिक्षा करीत बसले आहेत. इतक्यांत राधिका येते.)

अधरीं पावा धरुनि केशवा काढी स्वर नाना
चित्त-कोकिळा हे यदुपाळा हरपूं दे भाना
सकल कुंजवन फिरुनि मुरारी सुमनें वेचियली
हार गुंफिला तुजसाठीं हा वृत्ति गुंग झाली
कां नच वदसी एक शब्दही रोष काय धरिला
बोल जीविच्या जिवलग सखया
योग्य न हें तुजला
तुजसाठीं मी वेडी झाले सोडुनि संसारा

राधा—माधव वदति एक जन कां न कळे चतुरा
तुझ्या कृपेविण होईल कैशी सांगे गति माझी
नको कन्हया अंत पाहुं रे कां ही इतराजी
काय असा मी प्रमाद केला सांगें यदुनाथा
शद्धासाठीं जाण भुकेले ठेवी पदिं माथा
हास्य कुठें तव दडलें कृष्णा तृष्णा मम पुरवी
निशिदिनिं वाटें तुजला ध्यावें आस दुजी कुठली
लटकें सगळें प्रेम दाविलें आजवरी मजला
शठा उमगला डाव तुझा मज फसविसि अबलेला
वद अद्यापी किती मोहिल्या त्या मुग्धा बाला
जादुगार तूं केवळ गमसी स्वजना त्या मुकल्या
पुरे पुरे करि ढंग अतां हे बोल गड्या मजसी
व्यर्थ लबाडा गळा कापण्या कां माझा सजसी

छंद लागला नंदकिशोरा वंदन तव पाया
गंध नसे मज भक्तीचा पारि प्रेम देइ सखया
पदारविंदीं भृंगी गुंगे संगें धन्य करी
रंगे वृत्ति माया ममता नुरली कंसारी
केव्हांची तुज आळवितें मी सरली काय दया
दोष दिला पारि खेद वाटतो क्षमा करी सखया
पुरे अता कारि बोल राधिके जाई सदनाला
अपराधाविण दोष लाविसी केंवि सांग मजला
केव्हां पासुन वाट पहातों परवा नच तुजला
हार नको हा देइं फेकुनी गंधहीन असला
स्त्रीजातीचा अंत न लागे कपटाची राशी
कळले राधे प्रेम तुझे मज हो परती कैसी
पहा पालिकडे धेनू चरती जातो मी तिकडे
हरी न दिसता हरिणाक्षी ती पाहे चोहिकडे

बोले नच हो कठोर ऐसा चुकलें घे पदरीं
नको वाजवूं नाहीं आग्रह पावा ठेव दुरी
मुरली पायीं मूर्ति सुखाची अंतरली मजला
शोधु किती तुज हे घननीळा मुकुंद गोपाळा
सांग कोकिले मंजुल–कंठे मधुसूधन–वार्ता
बोला तरुनो वदा लतांनो झाले मी आर्ता.
पाषाणा तूं काय पाहिला राधा–हृदयेश
पाझर फुटला तुज न परी तो दिसतो जगदीश
उभ्या राहुनि काय करीती येथें या गाई
घाबरून कां दृष्टि लाविती शून्य दिशा दाही
प्राणविसावा दिसे न त्यांतें जीव बहूं दमला
हर हर आता जाऊं पाहें प्राणहि या काला

संकाव्य ८५१



पूर अश्रुचा वाहे नेत्रीं उत्कंठित झाले
नयन-मनोहर कधीं हरीची पाहिन पदकमलें
ऐक कन्हया मम शेवटची ही करुणा वाणी
नच येशी तरि मृत देहातें देखशील नयनीं
भोळा माझा भाव परंतू वृत्ति तुझी भलती
भार भूमिला झाले जगुनि काय लाभ जगतीं
येते आतां पुढच्या जन्मी अंतर नच देई
कृपा करावी क्षमा असावी विनती हे पायीं
वृक्षांतरित प्रभु त्या वेळीं पाहि कसोटी ही
मंजुळ वेणुध्वनी काढुनी चित्त तिचें मोही
जिवा शिवाच्या पडल्या गांठी प्रेमा ये भरती
मध्वराज कवि वंदित राधा-दामोदर मूर्ती

**कृष्णार्पणमस्तु.**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. 3780

# जरूर मागवा.

अनेक विद्वानांनीं व वृत्तपत्रकारांनीं
वाखाणलेली.

## (१) काव्य-प्रमोद
## (२) दर्प-दमन
## (३) वेणू-रव

हीं काव्यपुस्तकें जरूर मागवून सात्विक काव्यानंदांत मग्न व्हा. किंमत प्रत्येकीं एक आणा. साडेतीन आण्याचीं पोष्टांचीं तिकिटें पाठवून मागणी करा.

**सारस्वत सेवा मण्डळ,**
१४२० बसवणगल्ली, बेळगांव.

REFBK-0003140
REFBK-0003140

म.
विष
सं.



PRABODHAN PRESS, POONA.